# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. :०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय:०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट:www.panvelcorporation.com


## उमेदवारांना सूचना

**विषय : पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या निवडसूचीत नमूद निवड यादीतील उमेदवारांचे दस्तऐवज पडताळीबाबत.**

पनवेल महानगरपालिका सरळसेवा पदभरती-२०२३ अंतर्गत दि.०८.१२.२०२३ ते ११.१२.२०२३ या कालावधीत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन ३६ संवर्गाची निवडसूची पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून उमेदवारांच्या नावाची शिफारस दस्तऐवज पडताळणी, वैद्यकीय तपासणी व पूर्वचारित्र्य पडताळणीचे अधीन करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या खाली नमूद संवर्गातील निवड यादीत नमूद असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबत पुरावा, अधिवास प्रमाणपत्र व इतर सर्व दस्ताऐवज यांची मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह स्वत: (प्रतिनिधी चालणार नाही) दस्तऐवज पडताळणीकरीता खाली नमूद ठिकाणी व वेळी समक्ष उपस्थित रहावे.

| संवर्ग | दस्ताऐवज पडताळणी दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|
| माता व बाल संगोपन अधिकारी | दि. २१.०२.२०२४ सकाळी १०.३० वाजता | आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल. |
| क्षयरोग अधिकारी | | |
| हिवताप अधिकारी | | |
| पशुशल्य चिकित्सक (व्हेटर्नरी ऑफिसर) | | |
| महापालिका उप सचिव | | |
| महिला व बाल कल्याण अधिकारी | | |
| माहिती व जनसंपर्क अधिकारी | | |
| सहा. नगररचनाकार | | |
| सांख्यिकी अधिकारी | | |
| औषध निर्माता | | |
| कनिष्ठ अभियंता (विद्युत) | | |
| कनिष्ठ अभियंता (संगणक) | | |
| कनिष्ठ अभियंता (हार्डवेअर/नटवर्कींग) | | |
| सर्व्हेअर/भूमापक | | |

| | | |
|---|---|---|
| आरेखक (ड्राप्समन/स्थापत्य/तांत्रिक) | दि. २१.०२.२०२४<br>सकाळी १०.३० वाजता | आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल. |
| सहा. विधी अधिकारी | | |
| कनिष्ठ सुरक्षा अधिकारी | | |
| सहा. क्रीडा अधिकारी | | |
| सहाय्यक ग्रंथापाल | | |
| लघु लेखक (निम्नश्रेणी) (इंग्रजी/मराठी) | | |
| कनिष्ठ लिपीक (लेखा परिक्षण) | | |
| व्हॉलमन / कि-किपर | | |
| सार्वजनिक आरोग्य परिचारिका (पी.एच.एन) | | |
| वाहनचालक हलके) | | |
| वाहनचालक (जड) | | |
| स्वच्छता निरीक्षक | | |
| कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | | |
| परिचारिका (ANM) | | |
| अधिपरिचारिका (GNM) | | |
| कनिष्ठ लिपिक (लेखा) | | |
| वैद्यकीय अधिकारी | | |
| उद्यान पर्यवेक्षक | | |
| लघु लिपिक टंकलेखक | | |
| माळी | | |
| लिपिक टंकलेखक | दि. २२.०२.२०२४<br>सकाळी १०.३० वाजता | आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल. |

दस्ताऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा, स्वत:चे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने आरक्षित जागेकरीता अर्ज केला असल्यास त्या पुष्ठर्थ आवश्यक असलेली मुळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत सादर केलेली माहिती व अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रांच्या अनुषंगाने उमेदवाराने सोबत आणावयाची मुळ कागदपत्रे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | २ |
| १ | एस.एस.सी प्रमाणपत्र |
| २ | पदास आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करीत असलेबाबत तसेच आवश्यक अर्हतेपेक्षा जास्त शेक्षणिक अर्हता असल्यास त्याबाबत गुणपत्रिका व प्रमाणपत्रे. |
| ३ | वयाचे पुराव्याबाबत जाहिरात शुध्दीपत्रक क्र.१ मध्ये नमूद पुरावा दर्शविणारे प्रमाणपत्र. |
| ४ | उमेदवार मागास प्रवर्गातील असल्यास संबंधित जात प्रमाणपत्र. |
| ५ | अनूसुचित जमाती प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र. |

| १ | २ |
|---|---|
| ६ | वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र. |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र. |
| ९ | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १० | अनाथ आरक्षणकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| ११ | पदवीधर अंशकालीन आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १२ | भुकंपग्रस्त आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १३ | प्रकल्पग्रस्त आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १४ | उमेदवाराचे नावात बदल असल्यास विवाह नोंदणी दाखला अथवा राजपत्र इत्यादी. |
| १५ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबत महाराष्ट्रातील जन्म दाखला / डोमिसाईल प्रमाणपत्र. |
| १६ | ज्या पदाकरीता अनुभव आवश्यक आहे अथवा अनुभवास प्राधान्य आहे अशा पदाकरीता उमेदवाराने अनुभव नमूद केला असल्यास -<br>१. नियोक्त्याने दिलेला नियुक्ती आदेश<br>२. नियोक्त्याने दिलेले अनुभव प्रमाणपत्र<br>३. अनुभव कालावधीतील सर्व वेतन चिठ्ठी (पेमेंट स्लिप) ज्यात उमेदवाराचा आयडी क्रमांक व बँकेचे नाव नमुद असेल..<br>४. अनुभव कालावधीतील उमेदवाराचे वेतन जमा झाल्याचे नोंद असलेले बँक पासबुक अथवा बँक स्टेटमेंट. |

उमेदवार विहीत शैक्षणीक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडजाळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

दस्तऐवज पडताळणीकरीता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहिल व तो उमेदवारावर बंधनकारक राहील..

**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका.**